जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २१३ | गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

संक्षिप्त



### शरद पवार यांना डिस्चार्ज; प्रकृतीत सुधारणा

**पुणे, ता. २५ :** ज्येष्ठ नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्जार्ज देण्यात आला आहे. पुण्याच्या रूबी रुग्णालयात गेल्या चार दिवसांपासून ते उपचार घेत होते मात्र आता त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असल्याने डॉक्टरांनी त्यांना डिस्जार्ज दिला आहे. छातीत इन्फेक्शन झाल्यामुळे आणि अस्वस्थ वाटत असल्यामुळे २२ फेब्रुवारीला त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. चार दिवसांच्या विश्रांतीनंतर आज शरद पवारांना डिस्चार्ज देण्यात आला. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी प्रतिभा पवार आणि मित्र विठ्ठल मणियार होते.

# तरुणाच्या सतर्कतेमुळे लोणी काळभोर हद्दीत घरफोडीचा डाव उधळला

**लोणी काळभोर, ता. २५ :** पुणे शहराच्या सीमेवर वेगाने वाढणाऱ्या लोणी काळभोर परिसरात मध्यरात्री घरफोडीचा थरार उघडकीस आला आहे. बाजारमळा येथील दुंडे वस्ती परिसरात बुधवारी (ता. २५) पहाटे दोनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घरफोडीचा डाव आखला; मात्र घरमालकाच्या सतर्कतेमुळे त्यांचा प्रयत्न फसला. या घटनेने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर तीव्र प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंकुश दुंडे यांच्या घराची वीजपुरवठा लाइन मुद्दाम खंडित करण्यात आली. मध्यरात्री अचानक लाईट गेल्याने संशय आल्यामुळे दुंडे हे बाहेर पडले. बाहेर येताच दबा धरून बसलेले चोरटे घाबरून पळ काढू लागले. या वेळी चोरट्यांच्या हातात कोयतासदृश्य शस्त्र असल्याचे स्पष्ट दिसून आले. हा संपूर्ण प्रकार अमोल अशोक काळभोर (वय ४५, रा. बाजार मळा, दुंडे वस्ती) यांच्या घरासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. फुटेजमध्ये चोरटे घाईघाईने पळून जाताना दिसत असून, त्यांच्या हालचालींवरून ते नियोजनबद्ध पद्धतीने आले होते, हे स्पष्ट होते.



जर दुंडे यांनी बाहेर येण्याचे धाडस केले नसते, तर मोठी घरफोडी किंवा गंभीर गुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी रात्री गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. आम्ही जागे आहोत म्हणून चोरटे पळाले; पण पोलिस कुठे होते? असा संतप्त सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अवघ्या पाच दिवसांपूर्वी लोणी काळभोर पोलीस ठाणे येथील तब्बल ३३ पोलिसांची एकाच दिवशी बदली करण्यात आली. या मोठ्या बदल्यांमुळे ठाण्यात मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाल्याची चर्चा सुरू आहे. या परिस्थितीची माहिती गुन्हेगारांपर्यंत पोहोचली आहे का? पोलिसांची ताकद कमी झाल्याची चाहूल लागताच चोरट्यांनी लोणी काळभोरकडे मोर्चा वळवला आहे का? असे प्रश्न आता उघडपणे विचारले जात आहेत.

दरम्यान, लोणी काळभोर परिसरात मागील काही महिन्यांत चोऱ्या, घरफोड्या, भांडणे, दगडफेक आणि विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे नागरिक सांगत आहेत. पुणे शहर पोलीस दलाकडे अत्याधुनिक साधने, सीसीटीव्ही नेटवर्क आणि गस्त पथके असतानाही स्थानिक पातळीवर गुन्हे रोखण्यात अपयश का येते आहे? प्रतिबंधात्मक कारवाईत त्रुटी आहेत का? की मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढले आहे?

### पोलिसांसमोर मोठे आव्हान..


या घटनेने स्पष्ट केले आहे की, गुन्हेगार आता अधिक धाडसी झाले आहेत. वीजपुरवठा खंडित करून घराबाहेर काढण्याची युक्ती वापरणे म्हणजे गंभीर कटाचा भाग असल्याचे दिसते. अशा प्रकारांना वेळीच आळा घातला नाही, तर भविष्यात मोठ्या घटनांना सामोरे जावे लागू शकते. फक्त गुन्हा नोंदवून जबाबदारी संपत नाही; चोरटे पकडले गेले पाहिजेत. पोलिसांनी तातडीने या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास गतीमान करून आरोपींना जेरबंद करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे. लोणी काळभोरमध्ये कायदा-सुव्यवस्था राखणे हे केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करण्याची वेळ आता आली आहे.

### हडपसर येथे सळई डोक्यात पडून कामगार महिलेचा मृत्यू

**हडपसर, ता. २५ :** हडपसर येथील रामटेकडी औद्योगिक वसाहतीच्या आवारात लोखंडी जिन्याचे काम करताना क्रेनचा पट्टा तुटल्याने सळई डोक्यात पडून कामगार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातास जबाबदार ठरल्या प्रकरणी वानवडी पोलिसांनी क्रेन चालकासह ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला. वैशाली मारुती भोसले (वय ४७, रा. हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत भोसले यांचा मुलगा चेतन मारुती भोसले याने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर येथील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका खासगी कंपनीत वैशाली भोसले काम करत होत्या. कंपनीच्या आवारात मागील बाजूस लोखंडी जिना तयार करण्याचे काम १८ फेब्रुवारी रोजी सकाळी अकराच्या सुमारास सुरू होते. सकाळी अकराच्या सुमारास वैशाली भोसले आणि सहकारी कंपनीच्या आवारातून पिण्याचे पाणी आणण्यासाठी निघाल्या होत्या. क्रेन चालक लोखंडी जिना तयार करण्यासाठी सळई उचलत होता. त्या वेळी अचानक क्रेनचा पट्टा तुटला. पट्टा तुटल्यानंतर क्रेनने उचलेली सळई वैशाली यांच्या डोक्यात पडली. दुर्घटनेत वैशाली गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# सेमीफायनलसाठी भारताला किती रनांनी जिंकावा लागेल सामना?

**पुणे, ता. २५ :** दक्षिण आफ्रिकेकडून झालेल्या मोठ्या पराभवानंतर टीम इंडियाचा नेट रनरेट तब्बल -३.८०० वर घसरला असून, उपांत्य फेरीतील प्रवेशासाठी भारतासमोर मोठे आव्हान आहे. भारत ज्या गटात खेळत आहे, तो ग्रुप ऑफ डेथ म्हणून ओळखला जातो. कारण या गटातील भारतासह झिम्बाब्वे, वेस्ट इंडीज आणि साउथ आफ्रिका या सर्व संघांनी साखळी फेरीत एकही सामना गमावलेला नव्हता.




मात्र, अलीकडील पराभवानंतर भारताची स्थिती डळमळीत झाली आहे. आता केवळ विजय मिळवणे पुरेसे ठरणार नाही, तर नेट रनरेटमध्ये लक्षणीय सुधारणा करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गटातील संघांचे गुण समान राहिल्यास नेट रन रेट निर्णायक ठरणार आहे. भारताचा पुढील सामना २६ फेब्रुवारीला झिम्बाब्वे विरुद्ध होणार असून, या लढतीत मोठ्या फरकाने विजय मिळवणे अत्यावश्यक आहे. भारताने प्रथम गोलंदाजी केल्यास झिम्बाब्वेला कमीत कमी धावसंख्येवर रोखणे आणि त्यानंतर लक्ष्य वेगाने गाठणे गरजेचे ठरेल.

उदाहरणार्थ, झिम्बाब्वेने ९० धावांचे लक्ष्य दिल्यास भारताने ते अवघ्या ९ षटकांत पूर्ण केल्यास नेट रन रेट मध्ये मोठी वाढ होऊ शकते. १५० धावांचे लक्ष्य असल्यास ११ षटकांत विजय मिळवणे आवश्यक ठरेल, जे आव्हानात्मक असले तरी अशक्य नाही. १८० ते २०० धावांचे लक्ष्य मिळाल्यास १२ ते १५ षटकांत सामना संपवावा लागेल, तेव्हाच रनरेटमध्ये अपेक्षित सुधारणा साधता येईल. लक्ष्य जितके मोठे, तितका आवश्यक धावगतीचा दर अधिक राहणार असल्याने भारताच्या फलंदाजांना आक्रमक आणि धाडसी खेळ करावा लागणार आहे. सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी हा सामना करो किंवा मरो ठरणार आहे.

## कर्ज फेडण्यासाठी राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी विकली किडनी


**पुणे, ता. २५ :** सावकारांचे कर्ज फेडण्यासाठी राज्यातील तब्बल १९ शेतकऱ्यांनी आपली किडनी विकल्याची सुन्न करणारी माहिती राज्य सरकारने विधानसभेत दिली आहे. चंद्रपूर, सोलापूर आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये ही प्रकरणे प्रामुख्याने उघडकीस आली आहेत. तपासात सोलापूरमधील एका मध्यस्थाचा पर्दाफाश झाला आहे. या व्यक्तीने स्वतःची किडनी ८ लाखांना विकली आणि त्यानंतर इतर १६ जणांना या जाळ्यात ओढले. या रॅकेटमध्ये आतापर्यंत ११ आरोपी समोर आले असून, त्यातील ८ जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.



विधानसभेत नितीन राऊत आणि अतुल भातखळकर यांच्यासह अनेक आमदारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गृह विभागाने हे वास्तव मांडले. धक्कादायक म्हणजे, या व्यवहारासाठी आंतरराष्ट्रीय रॅकेट सक्रिय असून, या किडन्या थेट कंबोडियासारख्या देशांतील रुग्णालयांमध्ये विकल्या जात असल्याचे तपासात समोर आले आहे. चंद्रपूरच्या नागभीडमधील रोशन कुडे या शेतकऱ्याची कहाणी काळजाचा थरकाप उडवणारी आहे. त्याने सावकाराकडून केवळ १ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. व्याज इतकं वाढलं की, सावकाराने त्याच्याकडून ४८.५३ लाख रुपये आणि १ एकर जमीन घेतली. तरीही तगादा संपला नाही, अखेर या शेतकऱ्याला कर्जमुक्तीसाठी परदेशात जाऊन आपली किडनी विकावी लागली.

# पुण्यात दर तासाला ६ टन विषारी धूळ हवेत मिसळते

**पुणे, ता. २५ :** पुण्याची आता 'विषारी हवेचे शहर' अशी नवी ओळख निर्माण होत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या हवेत दर तासाला तब्बल ६ टन सिमेंटचे सूक्ष्म कण मिसळले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विकासाच्या नावाखाली सुरू असलेले काम थेट पुणेकरांच्या आरोग्यावर परिणाम करत आहेत.



पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या ५०२ अधिकृत रेडी मिक्स काँक्रीट प्लांट सुरू आहेत. मात्र, खरी भीती अनधिकृत प्लांटची आहे, ज्यांची संख्या १७५ च्या वर आहे. आकडेवारीनुसार, एक प्लांट वर्षाला १०० टन धुलिकण हवेत सोडतो. वडगाव, हडपसर, वाकड, खराडी आणि हिंजवडी यांसारखे आयटी आणि निवासी भाग आता या प्रदूषणाचे 'हॉटस्पॉट' बनले आहेत. नियमानुसार हे प्लांट वस्तीपासून २०० मीटर लांब हवेत, पण पुण्यात हे नियम फक्त कागदावरच उरले आहेत.

हे केवळ हवेतील प्रदूषण नाही, तर हे एक प्रकारचे संथ विष आहे. सिमेंटमधील सिलिका फुफ्फुसांमध्ये साचून 'सिलिकॉसिस' सारखा असाध्य आजार आणि कर्करोगाला निमंत्रण देत आहे. कॅल्शियम आणि ल्युमिनियम ऑक्साईडमुळे डोळ्यांची जळजळ आणि दम्याचे तीव्र झटके येण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठांसाठी ही हवा जीवघेणी ठरत आहेत. विकास हवाच, पण तो मानवी जीवनाच्या मुळावर उठणारा नसावा. प्रशासन आणि राज्यकर्त्यांनी तातडीने कठोर धोरण आखले नाही, तर पुण्याची ओळख लवकरच 'रुग्णालयांचे शहर' म्हणून होईल.

# इस्रायली संसदेला संबोधित करणारे नरेंद्र मोदी पहिले भारतीय पंतप्रधान

**नवी दिल्ली, ता. २५ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यासाठी रवाना झाले. गेल्या नऊ वर्षांतला हा त्यांचा दुसरा इस्रायल दौरा आहे. २५ आणि २६ फेब्रुवारीदरम्यान हा दौरा पार पडणार असून, इस्रायलचे पंतप्रधान बेन्जामिन नेतन्याहू यांच्या निमंत्रणावरून आपण ही भेट देत असल्याचे मोदी यांनी प्रस्थानापूर्वी सांगितले.



भारत आणि इस्रायल यांच्यात मजबूत व बहुआयामी धोरणात्मक भागीदारी निर्माण झाली असून, अलीकडच्या काळात या संबंधांना अधिक वेग मिळाल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. संरक्षण, तंत्रज्ञान, शेती, पाणी व्यवस्थापन आणि नवोन्मेष अशा विविध क्षेत्रांतील सहकार्य अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने नेतन्याहू यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यास आपण उत्सुक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या दौऱ्यात पंतप्रधान मोदी इस्रायलच्या संसदेला, म्हणजेच नेसेटला, संबोधित करणार असून हा मान मिळवणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान ठरणार आहेत. दोन्ही देशांना जोडणाऱ्या लोकशाही मूल्यांना ही भेट श्रद्धांजली ठरेल, असे त्यांनी म्हटले.

इस्रायलमधील भारतीय वंशाच्या नागरिकांशी संवाद साधण्याचीही त्यांची योजना आहे. भारतइस्रायल मैत्री अधिक दृढ करण्यासाठी भारतीय डायस्पोराची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. या भेटीमुळे द्विपक्षीय संबंधांना नवी दिशा मिळेल आणि धोरणात्मक भागीदारीसाठी नवे उद्दिष्ट निश्चित होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

# शिंदवणे घाटात भरधाव रिक्षा पलटी होऊन इनोव्हाला धडक; महिलेचा जागीच मृत्यू

**उरुळी कांचन, ता. २५ :** उरुळी कांचन - जेजुरी मार्गावरील शिंदवणे घाटात भरधाव वेगातील रिक्षा पलटी होऊन समोरून येणाऱ्या इनोव्हा कारला जोरदार धडक दिल्याने रिक्षातील एका ८५ वर्षाच्या महिलेचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी (ता. २४) सायंकाळी पाऊणे पाच वाजण्याच्या सुमारास शिंदवणे (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील रेल्वे ब्रिजचे पुढील वळणावर हा अपघात झाला.




यमुना साहेबराव जगताप (वय ८५, रा. राजेवाडी ता. पुरंदर) असे अपघातात मृत्यू झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. तर विजय साहेबराव जगताप (वय ५२, रा, राजेवाडी) असे रिक्षाचालकाचे नाव आहे. याप्रकरणी सलमान रहीस तांबोळी (वय २७, धंदा चालक रा. नंददीप कॉलनी नडेनगर काळेवाडी पिंपरी चिंचवड यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (ता. २४) सायंकाळी पाऊणे पाच वाजण्याच्या सुमारास शिंदवणे (ता. हवेली) गावाच्या हद्दीत घाटातील तीव्र वळणावर रिक्षा क्रमांक चक१२ छथ ४९३३ वरील चालक विजय जगताप यांनी वेगमर्यादा न पाळता निष्काळजीपणे वाहन चालविले. वळणावर नियंत्रण सुटल्याने रिक्षा पलटी झाली व समोरून येणाऱ्या इनोव्हा (MH १२ LP ००८३) गाडीला धडक बसली.

सदर अपघाताची माहिती मिळताच कस्तुरी रुग्णवाहिकेचे संतोष झोंबाडे, माऊली लाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ नागरिकांच्या मदतीने जखमी झालेल्यांना उरुळी कांचन येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र या अपघातात यमुना जगताप यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

दरम्यान, दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून इतरांना किरकोळ व गंभीर दुखापती झाल्या आहेत. या प्रकरणी सलमान तांबोळी यांनी संबंधित रिक्षा चालकाविरोधात उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

### घाटातील वळणे ठरतायत धोकादायक

शिंदवणे घाटातील अरुंद रस्ता, तीव्र वळणे आणि वाढता वेग यामुळे वारंवार अपघात होत असल्याची स्थानिकांची तक्रार आहे. प्रशासनाने येथे वेगनियंत्रण व इशारा फलक वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### स्पा सेंटरमधून उडी मारली की मारायला लावली? सीआयडी करणार तपास

पुणे, ता. २५ : पुण्यातील उच्चभ्रू विमाननगर भागात एका स्पा सेंटरवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यानंतर तरुणीने इमारतीवरून उडी मारल्याने तिचा मृत्यू झाला होता. दरम्यान, आता पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केला आहे. विमाननगरमधील एका इमारतीत स्पा सेंटरच्या नावाखाली बेकायदेशीर वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती विमानतळ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांच्या पथकाने तिथे छापा टाकला. मात्र, पोलिसांना पाहताच घाबरलेल्या एका तरुणीने आणि तिथे असलेल्या व्यवस्थापकाने स्वतः ला वाचवण्यासाठी दुसऱ्या मजल्यावरून थेट खाली उडी घेतली होती. दरम्यान, तरुणीचा मृत्यू झाला असून व्यवस्थापक गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर मृत तरुणीच्या नातेवाईकांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन या मृत्यूला जबाबदार कोण? असा सवाल केला. दरम्यान, या प्रकरणी सखोल चौकशी करावी असे सांगितले आहे. आयुक्तांनी हा तपास सीआयडीने करावा असे आदेश दिले आहेत.

### कोकणात पाऊस पण पुण्यात ढगाळ वातावरण

**पुणे, ता. २५ :** महाराष्ट्रात ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर हवामान अचानक बदलले असून राज्यातील विविध भागांत अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गेल्या २४ तासांत विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी गडगडाटासह पाऊस झाला. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून काही भागांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे हवामान विभागाचे प्रमुख एस. डी. सानप यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांचा वेग वाढल्यामुळे ढगांची निर्मिती होत आहे. परिणामी दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत गडगडाटासह पावसाची नोंद झाली आहे. ही स्थिती पुढील एक ते दोन दिवस कायम राहण्याची शक्यता असून त्यानंतर हळूहळू परिस्थिती पूर्वपदावर येईल. फेब्रुवारी ते मार्चदरम्यान हिवाळ्यातून उन्हाळ्याकडे होणाऱ्या संक्रमणकाळात वाऱ्यांची दिशा बदलते. त्यामुळे वातावरणात चढ-उतार होत असतात. याच पार्श्वभूमीवर सध्या राज्यात अवकाळी पावसाचे चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान, पुण्यात पुढील दोन दिवस ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. सध्या तरी पावसाची शक्यता नसून त्यानंतर तापमान पुन्हा सामान्य पातळीवर येईल, असेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

# नाशिक अक्कलकोट हरितक्षेत्र महामार्ग प्रकल्पाला गती मिळणार

**नाशिक, ता. २५ :** नाशिक ते अक्कलकोट हरितक्षेत्र महामार्ग प्रकल्पाला आता गती मिळताना दिसत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुढील २ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून जमीन संपादन प्रक्रियेला वेग दिला आहे. नाशिक जिल्ह्यात उर्वरित १०७.३३ हेक्टर जमीन तातडीने संपादित करण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. बाधित शेतकरी आणि नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यासाठी २१ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या या प्रकल्पाला आता नवे वळण मिळाले आहे.

केंद्र सरकारने सुरुवातीला सूरत ते चेन्नई असा सुमारे १२०० किलोमीटर लांबीचा हरितक्षेत्र म



हामार्ग उभारण्याचा विचार मांडला होता. मात्र महाराष्ट्रातील काही भागांत शेतकऱ्यांनी विरोध केल्याने सूरत ते नाशिक हा टप्पा रद्द करण्यात आला. आता नाशिकपासून पुढील दक्षिणेकडील भागावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आडगाव येथून सुरू होणारा हा महामार्ग अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर मार्गे अक्कलकोटपर्यंत जाणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील नाशिक, निफाड आणि सिन्नर तालुक्यातील ३० गावांमधून हा महामार्ग जाणार आहे. नाशिक तालुक्यातील आडगाव आणि विंचूरगवळी, निफाड तालुक्यातील दारणासांगवी, सावळी, चाटोरी, चेहडी, हेदारणा, लालपाडी, रामनगर, पिंपळगाव निपाणी आणि तळवाले तसेच सिन्नर तालुक्यातील देशवंडी, पाटपिंपरी, बारनाव पिंपरी, निमगाव सिन्नर, गुळवंच, देवपूर, खोपडी, फर्दापूर, धारणगाव, भोकणी, पांगरी, फुलेनगर, वावी, थोडेवाडी आणि कहांडलवाडी या गावांचा यात समावेश आहे. एकूण ३८७.३३ हेक्टर जमीन संपादन अपेक्षित असून त्यापैकी सुमारे २८० हेक्टर संपादन पूर्ण झाले आहे.

हा महामार्ग पूर्ण झाल्यानंतर उत्तर आणि दक्षिण महाराष्ट्रातील संपर्क अधिक मजबूत होईल. उद्योगांना जलद वाहतूक सुविधा मिळेल तसेच शेतीमालाची वाहतूक कमी वेळेत होऊ शकते. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि उद्योग क्षेत्राला फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३७४ किलोमीटर आहे. त्यात १५२ किलोमीटर भाग ७० मीटर रुंद आणि २२२ किलो मीटर भाग ६० मीटर रुंद असेल. ५.६ किलोमीटरचा मार्ग दऱ्याखोऱ्यांतून जाणार आहे. तसेच २७ मोठे पूल आणि १६४ लहान पूल व जोडरस्ते बांधले जाणार आहेत.

## कुटुंबाला कोयत्याचा धाक दाखवून २२ लाख लुटले

**जुन्नर, ता. २५ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात बोरी बुद्रुक येथे मध्यरात्री दोनच्या सुमारास अज्ञात दरोडेखोरांनी राजेंद्र कोरडे यांच्या घरात घुसून शस्त्राच्या धाकावर सोन्या-चांदीच्या दागिन्यांची लूट केली. चोरट्यांनी राजेंद्र कोरडे यांच्यावर काठीने हल्ला केला आणि घरातील सदस्यांच्या मानेवर कोयते लावले. ओरडलात तर कापून टाकू, अशी धमकी देत दरोडेखोरांनी संपूर्ण कुटुंबाला एका खोलीत डांबले आणि घरातील सर्व सोन आणि ऐवज लंपास केला. राजेंद्र कोरडे हे आपल्या कुटुंबासह शेतात घर बांधून राहतात. मध्यरात्री गाढ झोपेत असताना, चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजावर मोठा दगड फेकून तो तोडला. आवाजाने कुटुंब जागे झाले, पण समोरचे दृश्य पाहून सगळेच घाबरले. चोरट्यांनी राजेंद्र कोरडे यांच्यावर हल्ला केला आणि घरातील सदस्यांच्या मानेवर कोयते लावून मारून टाकण्याची धमकी देत, घरातील १५ तोळे सोन्याचे आणि १० तोळे चांदीचे दागिने लंपास केले.

# पुण्याच्या वानवडी परिसरात पाणीटंचाईचे संकट; १ एमएलडीची कपात

**पुणे, ता. २५ :** पुण्याच्या वानवडी परिसरात पाणीटंचाईचे संकट आता आणखी तीव्र होऊन बसले आहे. प्रशासनाने पाणीपुरवठ्यात१ एम एलडीची कपात केली असून, त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर झाला आहे. या कपातीमुळे वानवडी गाव आणि आसपासच्या सोसायट्यांमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असून, रहिवाशांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

**पाणीपुरवठ्याची घट : १० एमएलडी वरून ९ एमएलडी**

सुमारे आठ महिने पूर्वी वानवडी परिसराला दररोज १० एमएलडी पाणी मिळत होते. पण, आता प्रशासनाने तो ९ एमएलडीवर आणला आहे. हे पाणी पुरवठा करत



असताना लोकसंख्येचा वाढता दबाव आणि वाढत्या गरजांनुसार पुरवठा वाढवण्याची आवश्यकता होती, मात्र प्रशासनाने याला कमी केले. यामुळे पाणीपुरवठ्याची स्थिती आणखी गंभीर झाली आहे. यावर सामाजिक कार्यकर्ते प्रफुल्ल जांभूळकर यांनी महापालिका आयुक्त आणि लष्कर पाणीपुरवठा विभागाला पत्र लिहून, या कपातीला अन्यायकारक ठरवले आहे.

**अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा**

वाढत्या पाणीटंचाईमुळे वानवडी गाव, होले मळा, जांभूळकर मळा, तात्या टोपे सोसायटी, आणि एसव्हीनगर या परिसरांमध्ये पाणी पुरवठा अत्यंत कमी दाबाने होऊ लागला आहे. नागरिकांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी आणि घरकाम ासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. गृहिणींना त्यांच्या वेळेचे नियोजन करण्यासाठी विशेष कसरत करावी लागत आहे. यामुळे परिसरातील टंचाई आणखी तीव्र झाली आहे.

**प्रशासनाचे स्पष्टीकरण आणि नागरिकांची नाराजी**


लष्कर पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश शिंदे यांनी या कपातीला तांत्रिक कारणांमुळे घेतल्याचे सांगितले. त्यांच्यानुसार, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संपूर्ण शहराच्या पाणीपुरवठ्यात कपात केली गेली आहे. ज्या ठिकाणांहून कमी दाबाच्या तक्रारी येत आहेत, त्यावर निराकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण नागरिकांना कमी दाबाच्या तक्रारींचे निराकरण हा फक्त कागदावरचा दावा असल्याची भावना आहे.

उन्हाळ्याची चाहूल लागण्याआधीच वानवडीकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागते आहे, आणि या सध्याच्या परिस्थितीने आगामी महिने अधिक कठीण होऊ शकतात, असे स्पष्ट दिसते. प्रशासनाने लवकरात लवकर या समस्येवर उपाययोजना न केल्यास, वानवडीतील पाणी टंचाई आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

## पोलीस भरतीत धावताना तरुणाचा मृत्यू

**मुंबई, ता. २५ :** राज्यात विविध ठिकाणी पोलीस आणि रेल्वे पोलीस फोर्स भरतीसाठी मैदानी चाचण्या सुरू आहेत. या चाचण्यांदरम्यान १६०० मीटर धावण्याची स्पर्धा देताना आणखी एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यापूर्वी बीड आणि सांगली येथे अशा प्रकारच्या घटना घडल्या होत्या. आता मिरा भाईंदर परिसरातील भरती प्रक्रियेदरम्यान एका उमेदवाराचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील ३० वर्षांचा अक्षय मिसाळ हा तरुण पोलीस भरतीसाठी मुंबईत आला होता. घाटकोपर पूर्व येथील रेल्वे पोलीस मैदानावर सोम वारी सकाळी तो चाचणीसाठी उपस्थित झाला. पोलीस होण्याचे स्वप्न आणि कुटुंबाची परिस्थिती सुधारण्याची इच्छा मनात ठेवून तो तिसऱ्यांदा भरती प्रक्रियेत सहभागी झाला होता. सकाळी सुमारे १० वाजता १६०० मीटर धावण्याची चाचणी सुरू झाली. अक्षयने पूर्ण ताकदीनिशी धाव घेत अंतर पूर्ण केले. मात्र धाव पूर्ण केल्यानंतर काही वेळातच त्याला चक्कर आली आणि तो मैदानावर कोसळला. तेथे उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने त्याला राजावाडी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अक्षयच्या निधनाची माहिती गावी पोहोचताच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घरातून आनंदाने निघालेला मुलगा परत येणार नाही, यामुळे नातेवाईकांमध्ये शोक व्यक्त होत आहे. पंतनगर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



## सातबारा उताऱ्यावर नाव नोंदीतील विलंबामुळेही अनेक शेतकरी वंचित

**मुंबई, ता. २५ :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या पीएम किसान आणि नमो शेतकरी महा सन्मान योजनांबाबत महत्त्वाचा मुद्दा विधानसभा अधिवेशनात पुढे आला आहे. पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे यांनी या योजनांम धील तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र शेतकरी वंचित राहत असल्याचे लक्ष वेधले.

पीएम किसान योजना केंद्र सरकारने १ फेब्रुवारी २०१९ पासून सुरू केली. या योजनेतून दरवर्षी ६ हजार रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातात. महाराष्ट्र सरकारने त्याला पूरक म्हणून नमो शेतकरी महासन्मान योजना सुरू केली. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना एकूण १२ हजार रुपयांचा लाभ मिळतो. आतापर्यंत पीएम किसानचे २१ हप्ते वितरित झाले असून, राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे ३९ हजार कोटी रुपये जमा झाल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मात्र, अडचण निकषांमध्ये आहे. १ फेब्रुवारी २०१९ ही पात्रतेची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली. त्यामुळे २०१९ नंतर जमीन खरेदी केलेले शेतकरी योजनेत समाविष्ट होत नाहीत. तसेच सातबारा उताऱ्यावर नाव नोंदवण्यात झालेल्या विलंबामुळेही अनेकांना लाभ मिळत नाही. वडिलांच्या निधनानंतर वारस म्हणून नाव नोंदलेल्यांना लाभ मिळतो; परंतु नवीन खरेदीदार मात्र वंचित राहतात. शेतीचे व्यवहार वाढत असताना आणि जमीन मालकीत बदल होत असताना जुने निकष कायम ठेवले गेल्याने ही विसंगती निर्माण झाली आहे.

यावर कृषीमंत्री भरणे यांनी केंद्र सरकारशी चर्चा करून निकषांमध्ये बदल करण्यासाठी पत्र पाठविल्याचे सांगितले. पात्र शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सुधारित निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले. हा मुद्दा महत्त्वाचा यासाठी की, वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही आर्थिक मदत शेतकऱ्यांसाठी आधार ठरते. निकषांमध्ये बदल झाल्यास नव्याने जमीन घेतलेल्या हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणाला एक वर्ष उलटलं तरी पीडिता न्यायाच्या प्रतीक्षेत

**पुणे, ता. २५ :** पुण्यातील स्वारगेट बस आगारात घडलेल्या बलात्कार प्रकरणाला वर्ष उलटून गेले, तरीही न्यायालयीन प्रक्रियेला अद्याप गती मि ळालेली नाही. या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय रामदास गाडे याच्याविरोधात आरोप निश्चितीही झालेली नसल्याने पीडिता अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. दरम्यान, आरोपीने जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालय येथे धाव घेतली असून, निर्दोष मुक्ततेसाठी पुणे येथील सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

२५ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे पावणेसहा ते पावणेसात दरम्यान स्वारगेट आगारातील शिवशाही बसमध्ये तरुणीवर दोन वेळा बलात्कार केल्याचा आरोप गाडेवर आहे. घटनेनंतर तो शिरूर तालुक्यातील आपल्या गावाजवळील शेतात लपून बसल्याचे तपासात समोर आले होते. पुणे पोलिसांनी त्याला



अटक करून न्यायालयात हजर केले. सुरुवातीला १२ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली, त्यानंतर त्याची रवानगी येरवडा कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत करण्यात आली.

तपास अधिकाऱ्यांनी ५२ दिवसांत ८९२ पानांचे आरोपपत्र दाखल केले. ८२ साक्षीदारांची चौकशी, १२ पंचनामे, सीसीटीव्ही फुटेज, ओळख परेड, गुगल सर्च हिस्टरी आणि ध्वनी पडताळणीसारखे तांत्रिक पुरावे आरोपपत्रात नमूद आहेत. विशेष सरकारी वकील अजय मिसार सरकार पक्षाचे काम पाहत असून, पीडितेच्या वतीने स्वतंत्र वकील बाजू मांडत आहेत.

दरम्यान, आरोपीचे जामीन अर्ज पुणे न्यायालयाने यापूर्वी फेटाळले होते. आता उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालयातील अर्जांवर निर्णय झाल्यानंतरच आरोप निश्चिती होऊन मुख्य खटल्याची सुनावणी सुरू होईल. गंभीर स्वरूपाच्या या प्रकरणात न्यायप्रक्रियेतील विलंबामुळे कायदेशीर व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पीडितेला वेळेवर न्याय मिळणे हीच आता सर्वात मोठी अपेक्षा आहे.

## अजित पवार अपघात प्रकरणावरून रोहित पवार, अमोल मिटकरींची पोलिसांसोबत बाचाबाची

**मुंबई, ता. २५ :** मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात राष्ट्रवादीच्या आमदारांनी आक्रमक भूमिका घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. रोहित पवार आणि अमोल मिटकरी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करत पोलिसांशी थेट चर्चा केली. अपघातामागे घातपाताचा संशय असल्याचा दावा करत त्यांनी पुरावे उपलब्ध असूनही एफआयआर नोंदवला जात नसल्याचा आरोप केला.

आमदारांसोबत संदीप क्षीरसागर आणि त्यांचे वकील उपस्थित होते. कार्यकर्त्यांना पोलिसांनी केबिनबाहेर थांबवले होते. पोलिस उपायुक्त प्रवीण मुंढे घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी कायद्याच्या चौकटीत योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, केवळ तक्रार अर्ज नोंदवून



भागणार नाही, तर डीजीसीए आणि व्हीएसआर कंपनीविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी आमदारांची ठाम मागणी होती.

रोहित पवार यांनी डीजीसीएच्या अहवालात कंपनीच्या निष्काळजीपणाचे मुद्दे समोर आल्याचा दावा करत पोलिसांवर विलंबाचा आरोप केला. अमोल मिटकरी यांनीही चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा होत असल्याचे सांगितले. काही वेळ शाब्दिक वाद झाल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, पोलिस सूत्रांनी सांगितले की तक्रारीतील मुद्द्यांचा कायदेशीर अभ्यास करूनच पुढील पावले उचलली जातील. विमान अपघातासारख्या संवेदनशील प्रकरणात तांत्रिक आणि कायदेशीर तपास पूर्ण झाल्यानंतरच गुन्हा नोंदवण्याचा निर्णय घेतला जातो, असेही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

या घटनेमुळे राजकीय वातावरण अधिक तापले असून, पुढील काही दिवसांत तपासाची दिशा आणि पोलिसांची भूमिका काय राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कोल्हापूर–मुंबई दररोज विमानसेवा सुरू होणार

**कोल्हापूर, ता. २५ :** कोल्हापूर विमानतळावर नव्या टर्मिनस बिल्डिंगसह विविध विकासकामे सुरू आहेत. अशातच कोल्हापूरच्या आणखी एका मागणीस यश आले आहे. नुकतेच मुंबईचे नवीन विमानतळ सुरू झाल्याने जुन्या विमानतळावरील वाहतुकीचा ताण कमी झाला आहे. त्यामुळे कोल्हापूर ते नवी मुंबई या मार्गावर आठवड्यातील सातही दिवस, सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन सत्रांमध्ये २९ मार्चपासून विमानसेवा सुरू होणार आहे. इंडिगोकडून ही सेवा सुरू होत असल्याची माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.

रोज सकाळी आठ वाजता नवी मुंबई विमानतळावरून कोल्हापूरसाठी इंडिगोचे विमान उड्डाण घेईल. सव्वानऊ वाजता हे विमान कोल्हापुरात येईल, त्यानंतर




सकाळी ९ वाजून ३५ मिनिटांनी कोल्हापूर विमानतळावरून उड्डाण घेतलेले विमान नवी मुंबई विमानतळावर १० वाजून ३५ मि निटांनी पोहोचेल. तर सायंकाळी ७.२० वाजता नवी मुंबई विम ानतळावरून उड्डाण घेतलेले विमान रात्री ८.३० वाजता कोल्हापुरात येईल. त्यानंतर ८ वाजून ५० मिनिटांनी कोल्हापुरातून सुटणारे विमान ९.५० वाजता नवी मुंबई विमानतळावर उतरेल. विशेषम्हणजे आठवड्यातील सातही दिवस, इंडिगोची विमानसेवा सुरू होत असल्याने, कोल्हापुरातून मुंबईला जाऊन दिवसभरातील कामे पूर्ण करून पुन्हा सायंकाळी कोल्हापूरला परत येणे सहज शक्य होणार आहे, असे खासदार धनंजय महाडिक यांनी सांगितले. सुरुवातीला या मार्गावरील तिकीट दर ७ हजार ६०० रुपये असणार आहे.

# औद्योगिक वसाहतीत काम करताना क्रेनची सळई अंगावर पडून महिलेचा मृत्यू

**पुणे, ता. २५ :** पुण्यातील औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हडपसरमधील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत काम करत असताना ४७ वर्षीय महिला कामगाराचा क्रेन अपघातात मृत्यू झाला. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात क्रेन चालक आणि संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मृत महिला वैशाली मारुती भोसले (रा. गोसावी वस्ती, हडपसर) या एका खासगी कँमनीत काम करत होत्या. कँमनीच्या मागील बाजूस लोखंडी जिना उभारण्याचे काम सुरू होते. त्या वेळी क्रेनद्वारे सळई उचलण्याचे काम चालू असताना अचानक क्रेनचा पट्टा



तुटला. उचललेली जड सळई खाली कोसळून थेट वैशाली भोसले यांच्या डोक्यावर पडली. त्या गंभीर जखमी झाल्या. सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. वैशाली भोसले या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करत होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा चेतन आणि कुटुंबीय आहेत. चेतन भोसले (वय २१) यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली.

प्राथमिक तपासात कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षाव्यवस्था पुरेशा प्रमाणात नव्हत्या, तसेच क्रेनच्या उपकरणांची तपासणी व देखभाल योग्यरीत्या करण्यात आली नव्हती, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रात काम करताना हेल्मेट, सेफ्टी गिअर, तसेच यंत्रसामग्रीची नियमित तपासणी अनिवार्य असते. मात्र प्रत्यक्षात या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. ही घटना केवळ एका कुटुंबावर कोसळलेले दुःख नाही, तर औद्योगिक सुरक्षेच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. संबंधितांवर कारवाई झाली तरी अशा दुर्घटना टाळण्यासाठी कडक देखरेख आणि नियमित सुरक्षा तपासणी आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

पुणे प्राईम न्यूज



## मुंबईत रोहित पवार दर मंगळवारी जनता दरबार भरवणार



**मुंबई, ता. २५ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यशैलीची आठवण ताजी करत त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अजित पवार यांच्या पद्धतीनुसार आता रोहित पवार दर मंगळवारी जनता दरबार भरवणार असून नागरिकांच्या तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या समस्या थेट ऐकून घेणार आहेत.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून याबाबत अधिकृत पत्रक जाहीर करण्यात आले आहे. रोहित पवार हे पक्षाचे सरचिटणीस असून २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत मुंबईतील प्रदेश कार्यालयात पहिला जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे. अधिवेशन काळ संपल्यानंतर दर मंगळवारी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत नियमितपणे हा दरबार भरवण्यात येणार आहे.

अजित पवार यांची कामाची शैली राज्यात विशेष ओळखली जायची. पहाटेपासून कामाला सुरुवात करून लोकांच्या समस्या तत्परतेने सोडवण्याची त्यांची प्रतिमा होती. दर मंगळवारी जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांना थेट भेटण्याची परंपरा त्यांनी सुरू ठेवली होती. नियमात बसणारी कामे शंभर टक्के पूर्ण करण्याची त्यांची ख्याती होती. आता त्याच परंपरेचा वारसा रोहित पवार पुढे नेत असल्याचे चित्र आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अजित पवारांना आदरांजली वाहताना रोहित पवार भावूक झाल्याचे दिसून आले. अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांना हुंदका आवरता आला नाही. अजित पवारांच्या विमान दुर्घटनेबाबत रोहित पवार यांनी सातत्याने प्रश्न उपस्थित केले आहेत. पत्रकार परिषदांच्या माध्यमातून त्यांनी या प्रकरणातील तपास योग्य दिशेने व्हावा, अशी मागणी केली असून केंद्रीय उड्डाण मंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

## राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून महाराष्ट्रातील सहा नेत्यांना मिळणार संधी



**मुंबई, ता. २५ :** राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजेच सात जागा रिक्त होणार आहेत. राज्यसभा निवडणुकीसाठी उमदवारांच्या नावावर चर्चा करण्यासाठी मंगळवारी सायंकाळी उशिरा मुंबईत भाजपा कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह १२ वरिष्ठ नेते उपस्थित होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत अशा नावांची निवड करण्यावर भर देण्यात आला जी अंतिम निर्णयासाठी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली जातील. ही चर्चा अनेक तास चालली, अशीही माहिती देण्यात आली आहे. या बैठकीत कोणत्या नावांना संधी देण्यावर चर्चा झाली? भाजपा अन् एनडीएसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची का मानली जात आहे?

या बैठकीत विनोद तावडे, रामदास आठवले, रावसाहेब दानवे, प्रीतम मुंडे, विजया रहाटकर आणि भागवत कराड यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांच्या नावांवर चर्चा झाली. बैठकीत काही इतर नावांचाही विचार करण्यात आला. सूत्रांचे म्हणणे आहे की, पर्याय निवडताना पक्ष अनुभव, निष्ठा आणि प्रादेशिक प्रतिनिधित्वाचा विचार करत आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या नेत्यांनी आपली मते मांडल्याचे समजते.

पक्षातील सूत्रांनुसार, २८ फेब्रुवारीपूर्वी उमेदवारांची घोषणा करण्याची भाजपाची इच्छा आहे, त्यामुळे पक्षातील संभ्रम टाळण्यासाठी आणि स्पष्टता आणण्यासाठी पक्षनेतृत्व प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रासारख्या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यात राज्यसभेची निवडणूक पक्षासाठी महत्त्वाची मानली जात आहे. या निवडीकडे पक्षवर्तुळातही बारकाईने लक्ष दिले जात आहे, कारण त्यातूनच अंतर्गत संतुलन आणि भविष्यातील नियोजनाची दिशा स्पष्ट होणार आहे. अधिकृत घोषणा होईपर्यंत पडद्यामागे चर्चा सुरू राहण्याची शक्यता आहे. पक्षाच्या सूत्रांनी ही प्रक्रिया नियमित असली तरी महत्त्वाची असल्याचे म्हटले आहे.

## वाघोली परिसरात महसूल प्रशासनाचा दणका; बेकायदेशीर क्रशर व दगड खाणींवर कारवाई




**लोणी काळभोर, ता. २३ :** वाघोली (ता. हवेली) परिसरातील विक्री परवाना नसलेल्या क्रशर आणि नियमभंग करणाऱ्या दगड खाणींवर महसूल प्रशासनाने मोठी कारवाई सुरू केली आहे. राज्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार ही मोहीम हाती घेण्यात आली असून प्रशासनाच्या कारवाईमुळे खाण-क्रशर चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

२०२५-२०२६ या आर्थिक वर्षात गौण खनिज उत्खननाची स्वामीत्व धनाची रक्कम न भरलेल्या खाणींवरही जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर पावले उचलण्यात आली आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्या खाणी व क्रशर यांचा वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू करण्यात आली असून त्यामुळे अनेक व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्हा प्रशासनाने यापूर्वी अनेकदा क्रशर मालक व खानपट्टा धारकांना नियमांचे पालन करण्याबाबत लेखी तसेच तोंडी सूचना दिल्या होत्या. यासाठी वारंवार बैठका घेऊनही काही जणांनी नियमांकडे दुर्लक्ष केल्याने अखेर कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. विक्री परवाना न घेणारे तसेच स्वामीत्व धनाची रक्कम न भरणाऱ्या संबंधितांवर थेट कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. दरम्यान, परिसरात वाढलेल्या धूळ व हवा प्रदूषणाबाबत नागरिकांकडून आलेल्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने ही मोहीम अधिक तीव्र केली आहे. या कारवाईमुळे खाण मालक व क्रशर चालकांना नियमांचे पालन करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. महसूल विभाग, महावितरण आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईत आज तब्बल दहा खाण-क्रशर चालकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. नियमबाह्य काम करणाऱ्यांवर पुढेही अशीच कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती अपर तहसील कार्यालयाच्या तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील यांनी दिली.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताला मोठा झटका सौर पॅनेलवर लादला तब्बल १२६ टक्के टॅरिफ



**नवी दिल्ली, ता. २५ :** अमेरिकेने पुन्हा एकदा भारताला मोठा धक्का दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला मोठा धक्का देत सौर पॅनेलवर १२६ टक्के प्रारंभिक टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही ट्रम्प यांचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

भारताव्यतिरिक्त, डोनाल्ड ट्रम्पने अनेक देशांवर शुल्क लादले आहे. अमेरिका इंडोनेशियावर ८६ टक्के ते १४३ टक्के आणि लाओसवर ८१ टक्के पर्यंत शुल्क लादण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. अलीकडेच, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्पच्या कठोर निर्णयाला रोखले. त्यानंतर, ट्रम्पने सर्व देशांवर १० टक्के शुल्क लादले. न्यायालयाने ट्रम्पचा शुल्क निर्णय संसदेसमोर आणण्याचे आदेश दिले. आता, डोनाल्ड ट्रम्पने भारतावर आणखी एक शुल्क लादले आहे.

अमेरिकेच्या वाणिज्य विभागाचे म्हणणे आहे की भारताने त्यांच्या उत्पादकांना अन्याय्यपणे अनुदान दिले आहे. स्वस्त उत्पादने विकून यामुळे अमेरिकन कंपन्यांचे नुकसान होत आहे असा अमेरिकेचा आरोप आहे.

**भारतावर याचा किती परिणाम होईल?**

तज्ज्ञांच्या मते, ट्रम्पच्या मोठ्या शुल्कामुळे भारतीय कंपन्यांना अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश करणे अत्यंत कठीण होईल. २०२४ मध्ये, भारताने अमेरिकेला ७९२.६ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ६हजार५०० कोटी रुपये) किमतीची सौर उत्पादने निर्यात केली. २०२२ मध्ये, निर्यात २०२४ च्या तुलनेत नऊ पट कमी होती. नवीन शुल्क ट्रम्पच्या मानक शुल्कांपेक्षा वेगळे आहे, जे अलीकडेच न्यायालयाने रद्द केले होते. प्रत्युत्तरादाखल, ट्रम्प यांनी आधीच १० टक्के नवीन शुल्क लादले आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



## कोणत्या भाज्या आणि फळांमध्ये पोटॅशियम मुबलक असते

आपल्या उत्तम आरोग्यासाठी भाज्या आणि फळे ही फार गरजेची असतात. भाज्या आणि फळांमधून मिळणारी पोषक तत्वे आपल्या शरीरासाठी फार महत्त्वाची मानली जातात. आपल्या शरीराला पोटॅशियमची फार आवश्यकता असते. पोटॅशियम आपल्या मज्जासंस्थेचे कार्य सुरळीत ठेवते. तसेच आपल्या हृद्याच्या आरोग्यासाठी पोटॅशियम फार गरजेचे मानले जाते.

जेव्हा पोटॅशियमयुक्त पदार्थांची चर्चा केली जाते तेव्हा बहुतेक लोक केळीला एक चांगला स्त्रोत मानतात. परंतु केळ्याव्यतिरिक्त इतर अनेक पदार्थ आहेत. जे पोटॅशियमने समृद्ध आहेत. तेही आहारात समाविष्ट केल्याने पोटॅशियमची कमतरता भरुन निघते.

रताळे केवळ गोड नसून अनेक पोषक तत्वांचा स्त्रोत आहे. थंड हवामानात भाजलेले ते खाणे आनंददायी असते. रताळ्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ए चा देखील एक उत्कृष्ट स्त्रोत आहे. सोयाबीन हे व्हेज प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्त्रोत आहे हे सर्वांना माहित आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का की, ते पोटॅशियमने देखील समृद्ध आहे.

पोटॅशियमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुधाचा आहारात समावेश करावा. त्यात व्हिटॅमिन डी आणि बी १२ सारखे पोषक घटक देखील असतात, जे बहुतेक मांसाहारी पदार्थांमध्ये आढळतात.

जर्दाळू हे पोटॅशियमचा चांगला स्त्रोत आहे. २ ताजे जर्दाळू तुमच्या दैनंदिन पोटॅशियमच्या गरजेच्या ४ टक्के भाग पुरवू शकतात. ते बीटा-कॅरोटीन, ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनचा देखील एक चांगला स्त्रोत आहे, जे तुमच्या डोळ्यांसाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक आहेत. संत्री व्हिटॅमिन सीचा एक उत्कृष्ट स्त्रोत मानली जातात, परंतु त्यामध्ये पोटॅशियम देखील भरपूर असते.

# बारामती पोटनिवडणुक बिनविरोध? पार्थ पवार राज्यसभेसाठी उमेदवार

**बारामती, ता. २५ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनर्परीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून १ जानेवारी २०२६ पर्यंत नोंद असलेले मतदारच या पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. तर राज्यसभा निवडणुकीसाठी पार्थ पवार यांना उमेदवारी देण्याचा महत्त्वाचा निर्णयही पक्षाच्या कोअर कमिटीने घेतल्याची माहिती आहे.

या मतदारसंघाची अंतिम मतदारयादी १० मार्च रोजी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप यादी जाहीर झाल्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव जवळपास



निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने ही निवडणूक बिनविरोध करण्यावर भर देण्याची भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढविण्याबाबत एकमत झाल्याचे समजते.

पार्थ पवार राज्यसभेच्या रिंगणात आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी पार्थ पवार यांना उमेदवारी देण्याचा महत्त्वाचा निर्णयही पक्षाच्या कोअर कमिटीने घेतल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित बैठकीत या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ही बैठक प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी पार पडली. बैठकीला प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. तसेच २६ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भातील राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीच्या तयारीवरही चर्चा झाल्याचे कळते.

येत्या काही दिवसांत वरळी डोम येथे पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक होणार असून, त्यामध्ये सुनेत्रा पवार यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून औपचारिक शिक्कामोर्तब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना त्यामुळे वेग आला आहे.

## पुण्यात १५ वर्ष जुन्या वाहनांना प्रवेशबंदी

**पुणे, ता. २५ :** पुणे आता 'वाहतूक कोंडी' आणि 'प्रदूषणाचे' केंद्र बनू लागले आहे. रस्त्यांवर वाढलेली वाहनांची संख्या आणि त्यातून बाहेर पडणारा विषारी धूर यामुळे पुणेकरांचा श्वास गुदमरत आहे. यावर उपाय म्हणून पुणे जिल्हा प्रशासनाने आता 'सर्जिकल स्ट्राईक' करण्याची तयारी केली असून, १५ वर्ष जुन्या असलेल्या सुमारे ७ लाख वाहनांना पुण्याच्या मुख्य भागात प्रवेशबंदी करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे.

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी हा कडक पवित्रा घेतला आहे. सध्या पुण्याच्या रस्त्यांवर अशी ७ लाख वाहने धावत आहेत, जी १५ वर्षांहून अधिक जुनी आहे. ही वाहने केवळ प्रदूषणच वाढवत नाहीत, तर जुन्या इंजिनमुळे ती अनेकदा ऐन गर्दीच्या वेळी रस्त्याच्या मधोमध बंद पडतात. यामुळे होणारी वाहतूक कोंडी बराचवेळ सुटत नाही. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास, १५ वर्षांहून अधिक जुनी पुण्यात दिसून येणार नाही.

# ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील दागिने लुटणारा जेरबंद; शिरूर पोलिसांची कारवाई

**योगेश मारणे**

शिरूर, ता. २५ : शिरूर तालुक्यातील शरदवाडी परिसरातील जांबुत-जोरीलवन येथे ९० वर्षीय ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे सहा तोळे सोन्याचे दागिने जबरीने हिसकावून नेणाऱ्या आरोपीला शिरूर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. चोरीस गेलेले सर्व दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.



या घटनेबाब शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,शुक्रवारी (ता. २०) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास फिर्यादी नातेवाईकांसह लग्नकार्याकरिता बाहेर गेले असताना त्यांच्या घरासमोरील वरांड्यात बसलेल्या त्यांच्या आई लहानूबाई सखाराम सरोदे (वय-९०) यांच्या गळ्यातील सहा तोळे सोन्याचे दागिने एका अज्ञात इसमाने बळजबरीने हिसकावून नेले.या दागिन्यांची अंदाजे किंमत ४ लाख ८० हजार रुपये आहे.

या प्रकरणी फिर्यादी मच्छिंद्र सखाराम सरोदे(रा.शरदवाडी, जांबुत-जोरीलवन,ता.शिरूर, जि.पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाला आरोपीचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले.तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला.या दरम्यान आरोपी आकाश किसन मेरगळ (वय-२०, रा. पंचतळे-जांबुत, ता. शिरूर, जि. पुणे) याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुलीदिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सहा तोळे वजनाचे, ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण तसेच पोलीस अंमलदार नितेश थोरात, सचिन भाई,विजय शिंदे, निरज पिसाळ, निखिल रावडे, अजय पाटील, दादाराव नागरे, भाऊसाहेब ठोसरे, शंकर बल्लाळ यांच्या पथकाने केली.

## चिमुकल्याला गरम इस्त्रीचे चटके दिल्याने बापावर गुन्हा दाखल

**मुंबई, ता. २५ :** मुंबई येथील मीरा रोड परिसरातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका ३३ वर्षांच्या पित्याने आपल्याच ९ वर्षांच्या निष्पाप मुलाला गरम इस्त्रीचे चटके देऊन अमानुषपणे मारहाण केली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी भाईंदरमधील नवधर पोलीस ठाण्यात आरोपी पित्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपी व्यक्तीच्या पत्नीचे निधन झाले आहे. तो आपल्या लहान मुलासोबत मीरा रोड भागात वास्तव्यास आहे. या मुलाला त्याने शिक्षणासाठी मथुरा-वृंदावन येथील एका निवासी शाळेत म्हणजेच बोर्डिंगमध्ये ठेवले आहे. २० डिसेंबर २०२५ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा मुलगा सुट्टीसाठी आपल्या घरी आला होता. याच काळात वडिलांनी त्याला अत्यंत क्रूर वागणूक दिली. मुलगा जेवण व्यवस्थित करत नाही किंवा अभ्यास करत नाही अशा अगदी शुल्लक कारणांवरून वडिलांनी त्याला राग भरला. इतकेच नाही तर रागाच्या भरात त्यांनी मुलाला घाणेरड्या शिव्या दिल्या आणि गरम इस्त्रीने त्याच्या शरीरावर चटके दिले.

सुट्टी संपल्यानंतर जेव्हा मुलगा पुन्हा आपल्या शाळेत परतला, तेव्हा तेथील शिक्षकांच्या लक्षात हा प्रकार आला. मुलाच्या अंगावरील जखमा पाहून शिक्षकांनी त्याला विश्वासात घेऊन विचारपूस केली. त्यावेळी घाबरलेल्या मुलाने वडिलांनी केलेली ही अमानुष कृत्य शिक्षकांना सांगितली.



## उरुळी कांचन येथे गुरु तेग बहादुर साहिबजी शहीदी समागम निमित्त एनसीडी आरोग्य शिबिर

**उरुळी कांचन, ता. २५ :** हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त उरुळी कांचन (ता. हवेली) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पांढरस्थळ यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एनसीडी (असंसर्गजन्य आजार) आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ३० वर्षांवरील स्त्री-पुरुषांची रक्तदाब (इझ), मधुमेह (ऊच), उंची व वजन तपासणी करण्यात आली. तसेच उपचार सुरू असलेल्या रक्तदाब व साखर रुग्णांना आरोग्य शिक्षण व समुपदेशन देण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढून ग्रामस्थांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. याशिवाय चित्रकला स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांनी आरोग्यविषयक संदेश चित्रांद्वारे व्यक्त केले. शाळा परिसर स्वच्छता उपक्रमही राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी आरोग्य सेविका श्रीमती मिनल जगताप, आरोग्य सेवक गणेश फाळके तसेच आशा वर्कर अश्विनी कुंभार, अश्विनी लोखंडे, सीमा चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका खामकर मॅडम व बागवान मॅडम यांचीही उपस्थिती लाभली. गुरु तेगबहादुर साहिबजींच्या बलिदान दिनानिमित्त आरोग्य जनजागृतीचा संदेश देत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## अल्पवयीन मुलीची छेडछाड करणाऱ्या खडकीतील आरोपीला अटक

**दौंड, ता. २५ :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून घडलेली घटना कोणाला सांगितल्यास तुला कापून टाकिन अशी जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी खडकी (ता. दौंड) येथील तरुणाला अटक करण्यात आली आहे. दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ डिसेंबर २०२५ ते १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी चार वाजण्याच्या दरम्याण खडकी (ता. दौंड) ग्रामपंचायत हद्दीत हि घटना घडली आहे.

अमोल छगन शिंदे (रा. खडकी, ता. दौंड), असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलीने दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी अमोल शिंदे याला अटक करण्यात आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी साडेतीन वाजल्यापासून ते १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी चार वाजेपर्यंत खडकी (ता. दौंड) परिसरात आरोपी अमोल शिंदे याने अल्पवयीन पीडितेचा किराणा दुकानाच्या रस्त्यावर तसेच ओळखीच्या व्यक्तीच्या घरासमोर वेळोवेळी पाठलाग केला.

आरोपीने तुझ्याशी लग्न करायचे आहे असे म्हणत पीडितेचा हात पकडून मिठी मारली व तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच घडलेली घटना कोणाला सांगितल्यास तुला कापून टाकीन अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ आरोपी अमोल शिंदे याच्यावर भा.न्या.स. कलम ७४, ७८ तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. तपास पोलीस उपनिरीक्षक उगले तपास करीत आहेत.

## राज्यातील २५५ मराठी शाळा बंद

**मुंबई, ता. २५ :** राज्यातील मराठी शिक्षण व्यवस्थेसाठी गंभीर चित्र समोर आले आहे. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या पाचही विभागांतील तब्बल २५५ मराठी शाळा बंद झाल्याची माहिती सरकारने विधानसभेतील लेखी प्रश्नोत्तरातून दिली आहे. घटती विद्यार्थीसंख्या आणि पालकांचा वाढता इंग्रजी माध्यमाकडे कल ही यामागील प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. रोजगाराच्या वाढत्या संधी, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि जागतिक स्तरावर संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी अनेक पालक इंग्रजी माध्यमाला प्राधान्य देत आहेत. परिणामी ग्रामीण व निम शहरी भागातील मराठी शाळांमध्ये पटसंख्या सातत्याने घटत आहे. कमी विद्यार्थीसंख्येमुळे काही शाळा एकत्रित करण्यात आल्या, तर काही पूर्णतः



बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला. सरकारच्या माहितीनुसार, राज्यातील

सर्व विभागांत या शाळा बंद झाल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागात लोकसंख्येतील बदल व स्थलांतर, खासगी इंग्रजी शाळांची वाढ, पालकांची बदलती शैक्षणिक अपेक्षा यांचा मोठा परिणाम मराठी माध्यमावर झाला आहे.

**मराठी शिक्षणासमोर मोठे आव्हान**

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, मराठी भाषा व संस्कृती जपण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळा टिकणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र बदलत्या शैक्षणिक प्रवाहात स्पर्धात्मक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. आधुनिक सुविधा, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास परिस्थिती सुधारू शकते.

**शासनाच्या उपाययोजना**

- इयत्ता १ ते ८ पर्यंत मोफत पाठ्यपुस्तके
- मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य
- कमी पटाच्या शाळांसाठी विशेष योजना
- शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपक्रम
- डिजिटल शिक्षण साधनांची उपलब्धता

# जावयाने भरशेतात सासऱ्याचा गळा चिरला; स्वत:वरही केले वार

**सोलापूर, ता. २५ :** सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील इंगळगी गावात मंगळवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. शेतात असताना जावयाने सासऱ्यावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करत त्यांची निर्घृण हत्या केली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचे नाव सिकँदर मुलका शेख असे असून, आरोपी जावई सादिक सैफन दफेदार असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.




याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सिकंदर शेख हे शेतात काम करत असताना सादिक दफेदार याने अचानक धारदार चाकूने वार केले. या हल्ल्यात सिकंदर शेख यांचा जागीच मृत्यू झाला. सासऱ्यावर वार केल्यानंतर आरोपीने स्वतःवरही वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. जखमी अवस्थेत त्याला सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच वळसंग पोलीस ठाणे येथील अधिकारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. जावयाने सासऱ्याचा खून नेमक्या कोणत्या कारणातून केला, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर मृत सिकंदर शेख यांचा मुलगा आणि मुलगी पोलीस खात्यात कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातील नागरिकांकडून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे. या हत्याकांडामुळे वळसंग परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यावर तरुणीचे गंभीर आरोप

**अहिल्यानगर, ता. २५ :** अहिल्यानगर शहराचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर एका २२ वर्षीय तरुणीने गंभीर आरोप केल्याने संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. नोकरीचे आमिष दाखवून अभिषेक कळमकर यांनी आपल्यासोबत गैरवर्तन, अत्याचार आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची लेखी तक्रार या पीडित तरुणीने पोलिसांकडे दिली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले असून, एका बड्या राजकीय नेत्यावर



अशा प्रकारचे गंभीर आरोप झाल्याने खळबळ उडाली आहे. पोलीस सध्या या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत असून, पीडितेच्या तक्रारीनुसार पुढील कायदेशीर तपास आणि कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, शाळेत नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत आरोपीने संबंधित तरुणीशी ओळख वाढवली. त्यानंतर अहिल्यानगर शहरातील काही ठिकाणी तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील एका लॉजमध्ये नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच आक्षेपार्ह व्हिडिओ तयार करून ब्लॅकमेल केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाशी संबंधित काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याची चर्चा असून त्यामुळे प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे.

तरुणीने दिलेल्या माहितीनुसार, तिने विरोध केला असता आरोपीने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. ही बाब कुणाला सांगितल्यास परिणाम भोगावे लागतील, असेही सांगितल्याचा आरोप आहे. राजकीय दबाव आणि भीतीमुळे तिने आतापर्यंत तक्रार केली नव्हती. मात्र अन्य एका महिलेलाही अशाच प्रकाराचा अनुभव आल्याची माहिती मिळाल्यानंतर तिने पुढे येत पोलिसांत तक्रार दाखल केली. हा गुन्हा सुरुवातीला एमआयडीसी पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला होता. पुढील तपासासाठी प्रकरण तोफखाना पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी २ विशेष पथके तयार केली असून तपास सुरू आहे.

## प्रेमप्रकरणाच्या संशयावरुन तरुणाला बेदम मारहाण

**पुणे, ता. २४ :** प्रेमप्रकरणाच्या संशयावरुन तरुणाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना भवानी पेठेतील कासेवाडी भागात घडली. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून, साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अमन सुभाष मोरे (वय-२६, सध्या रा. दत्तवाडी, मूळ रा. कासेवाडी, भवानी पेठ) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी अल्तमश नासीर शेख (रा. कासेवाडी, भवानी पेठ) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यातआला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमन याचे एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचा संशय शेख याला होता. अमन आणि त्याची मैत्रीण हे २३ फेब्रुवारी रोजी सिंहगडावर फिरायाल निघाले होते. अमनच्या मैत्रिणीचे डोकेदुखत असल्याने ते एका औषध विक्री दुकानात गेले. डोके दुखीवर त्यांनी गोळ्या घेतल्या.